नि. दि. दावा क्रमांक **३८८/२०१९** स्वरुप वि. वैजनाथ व इतर

**प्रतिवादी साक्षीदार क्रमांक ०१** **नि. क्र.३३ पुढे सुरु**

**वैजनाथ धोंडीबा शिंदे**

**उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री पवार ए.व्ही. यांच्यामार्फत –**

**१०.** माझे शिक्षण दहावी असुन मला लिहीता वाचता येते. मी दावा मिळकतीचा ७/१२ पाहीला आहे. त्याच्यावर किती खातेदार आहेत हे मला आता सांगता येत नाही. सर्वे नं.०९ चे संपुर्ण क्षेत्र हे ०३ हे. ३८ आर आहे. सर्वे नं.०९ च्या चारही बाजुंचे गट नंबर मला आता सांगता येत नाहीत.

**११.** सन १९९० पासुन मी लातूर येथे राहतो. माझे मुळ गाव होळी आहे. मला वडीलोपार्जीत जमीन नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमचा मुळ व्यवसाय शेती नाही. मी जमीन खरेदीपुर्वी जिल्हाधिकारी यांची परवानगी घेतली नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादीसोबत माझी ओळख ही पानचिंचोली येथील प्लॉटींग व्यवहारातुन झाली आहे. त्यामुळे आमचे मैत्रीसंबंध होते.

**१२.** हे मला माहीत नाही की, वादीने संभाजी रामराव जाधव याचेकडुन तीन लाख रुपये हातउसने सन २०१७ मध्ये घेतले होते. हे मला माहीत नाही की, सदर रक्कमेच्या बदल्यात वादीने त्याचे गट नं.०९ मधील ४० आर क्षेत्र नाममात्र खरेदीखताने दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमीनीतील अर्धे उत्पन्न संभाजी व अर्धे उत्पन्न वादी घेत होता. हे म्हणणे खरे नाही की, संभाजीला पैशांची गरज पडल्यामुळे त्याने वादीला पैसे परत मागितले होते. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१७ मध्ये वादीने मला उसने घेतलेले पैसे परत देण्यासाठी तीन लाख रुपये मागितले होते.

**१३.** हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या सांगण्यावरुन संभाजी याने मला नाममात्र खरेदीखत करुन दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीवर संभाजी रामराव जाधवचा तसेच माझा देखील ताबा नव्हता.

**(वादीतर्फे विधीज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन उर्वरीत उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.)**

**श्र. नि. स्वीकृत,**

Digitally signed by PARAG PHADNIS AWATE
Date: 2026.01.22 17:32:56 +0530

**(श्री. आवटे पी. पी.)**

**दिनांक – २२/०१/२०२६** **सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, औसा.**

**ठिकाण – औसा** **जिल्हा लातूर.**